# महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

वैद्यकीय शिक्षण व संशोधन शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारात, चौथा मजला, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी.डीमेलो रोड, मुंबई - ४०० ००१. ई-मेल - msbnpe@gmail.com, दुरध्वनी: ०२२ -२२६२०३६०

## MAHARASHTRA STATE BOARD OF NURSING AND PARAMEDICAL EDUCATION

Directorate of Medical Education and Research, 4th Floor, St. Georges Hospital Campus, D' Melo Road, Fort, Mumbai – 400 001.
E-mail- msbnpe@gmail.com, Telephone – 022-22620360

---

क्र. मराशुवपशिमं/विद्यार्थी क्षमता/ ९१८२ /२०२३ दि. २९ /०५/२०२३

प्रति,
प्राचार्य/ संस्थाप्रमुख,
सर्व संलग्नित ए.एन.एम., जी.एन.एम. व
इतर परिचारीका प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य.

विषय - जी.एन.एम. अभ्यासक्रमाच्या ८० किंवा त्यापेक्षा जास्त विद्यार्थी क्षमतेच्या परवानगीबाबत.

संदर्भ - १. भारतीय परिचर्या परिषद नियमावली (ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रमाकरीता)
२. Indian Nursing Council Act, १९४७ (XLVIII), दि. १२ मार्च २०२१.
३. नियामक मंडळाची बैठक दि. २६/०८/२०२२
४. नियामक मंडळाची बैठक दि. १७/१०/२०२२
५. मंडळाची बैठक दि.१५/१२/२०२२
६. मराशुवपशिमं/३७३५-३७४१/२०२२, दि. १६/०७/२०२२.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की,

१. संदर्भ क्र. १ भारतीय परिचर्या परिषदेच्या नियमावली व भारतीय परिचर्या परिषदेच्या संदर्भ क्र. २ मधील अधिसूचनेतील नियम १७ मधील पोट नियम (i) नुसार ए.एन.एम. अभ्यासक्रमाकरीता जास्तीत जास्त ६० विद्यार्थी क्षमतेने मंजूर करता येतील.
२. संदर्भ क्र. १ भारतीय परिचर्या परिषदेच्या नियमावली व भारतीय परिचर्या परिषदेच्या संदर्भ क्र. २ मधील अधिसूचनेतील नियम १७ मधील पोट नियम (i), (ii), (iii) ला अनुसरुन जी.एन.एम. अभ्यासक्रमाच्या ६० विद्यार्थी क्षमतेकरीता १०० ते ३०० खाटांचे स्वत:चे (पॅरेंट) रुग्णालय असणे आवश्यक आहे. तसेच ८० ते १०० विद्यार्थी क्षमतेकरीता ३०० खाटांचे स्वत:चे (पॅरेंट) रुग्णालय असणे आवश्यक आहे.

त्यानुसार ज्या संस्थांना ८० ते १०० विद्यार्थी क्षमतेकरीता परवानगी देण्यात आलेली आहे अशा संस्थांनी १५ दिवसात ३०० खाटांचे स्वत:चे (पॅरेन्ट) रुग्णालयांची आणि इतर संलग्नित रुग्णालयाची वैध नोंदणीपत्र, मुद्रांकपत्रावरील सामंजस्य करार व महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळाचे प्रमाणपत्र मंडळास सादर करावेत. ज्या संस्था वरील प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणार नाहीत, अशा संस्थांची विद्यार्थी क्षमता कमी करुन त्यांना पुढील शैक्षणिक वर्षाकरीता संलग्नता पत्र देण्यात येईल. याकरीता सर्वस्वी संस्था प्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

संचालक
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ

प्रत-
१. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
२. मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण विभाग, मुंबई.
३. मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.